# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०० ०९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ १८८९ /२०१७

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला,वाणिज्य,विज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने मार्च/एप्रिल, २०१७ मध्ये घेतलेल्या प्रथम वर्षाच्या सत्र—१ व २च्या परीक्षेसाठी जे विद्यार्थी परीक्षेच्या काळात स्वत: आजारी असल्यामुळे, परीक्षेच्या काळात आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक तसेच क्रीडा कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणुन उपस्थित राहिल्यामुळे, राष्ट्रीय सेवा योजना(NSS) तसेच राष्ट्रीय छात्र सेना(NCC) सहभागी असल्यामुळे परीक्षेच्या काळात संबंधीतांनी आयोजित केलेल्या शिबिरात उपस्थित राहिल्यामुळे परीक्षेला उपस्थित राहु शकले नाही, अशा विद्यार्थ्याकडुन पुर्नपरीक्षा घेण्यासंदर्भात करण्यात आलेली विंनतीपत्र आपल्या शिफारशीसह आवश्यक त्या अभिलेखासह खालील नमुन्यात विद्यापीठाकडे दि. २१जून, २०१७ पर्यंत हस्तेपोच करण्यात विंनती आहे. जेणेकरून विभागाला पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

१) विद्यार्थ्याचे नाव:—

२) परीक्षेचे नाव व सत्र:—

३) विषय:—

४) परीक्षेस उपस्थित न राहू शकल्याचे कारण आवश्यक त्या सबळ पुराव्यासह.

अ) आजारी असल्यास वैद्यकीय अधिक्षकांचे/जिल्हा शल्यचिकित्सकांचे प्रमाणपत्र):—

ब) समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना/राष्ट्रीय छात्र सेना यांचे शिफारस पत्र:—

क) सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणुन उपस्थित राहण्याचे पत्र:—

उपरोक्त बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मुंबई — ४०००९८
दि. १६ जून, २०१७.

(दीपक वसावे)
स्था. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रत:—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला,वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. [illegible]